# सचिन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

## मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०००८१

**(Regd. No. BOM/HSG/1629 of 1968)**

न.क्र. ____________________

दिनांक : **10.09.2024**

## सूचना

सचिन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सर्व संभासदाना कळविण्यात येते की संस्थेची 2023-2024 या सहकारी वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक 26 सप्टेंबर 2024 रोजी संध्याकाळी ठीक 07.00 वाजता संस्थेच्या श्रीगणेश मंदिरात खालील विषय सूची नुसार कामकाज करण्यासाठी आयोजित केली आहे.

## विषय सूची

1) 2019-2020, 2020-2021 चे लेखा परीक्षण तत्कालीन व्यवस्थापन समितेने केले नाही. त्याबाबत सर्वसाधारण सभेला अवगत करणे.
2) 2021-22, 2022-2023 चे लेखा परीक्षण त्यावेळचे प्रशासक श्री. सुरेश सरूडकर व श्री. विशाल निंबाळकर यांनी करणे आवश्यक होते. त्याबाबत सर्वसाधारण सभेला अवगत करणे.
3) 2023-2024 च्या लेखा परीक्षणा बाबत सर्वसाधारण सभेला माहिती देणे.
4) बृहनमुंबई महानगर पालिकेच्या मालमत्ता करांबाबत सर्वसाधारण सभेला अवगत करणे.
5) इमारत क्र.1 मधील संस्थेची वाणिज्य जागा बँक ऑफ महाराष्ट्र यांना भाड्याने दिली होती. त्याबाबत सर्वसाधारण सभेला अवगत करणे.
6) पुनर्विकासबाबत झालेल्या प्रगतीबाबत आढावा घेणे
7) संस्थेकडे बृहनमुंबई महानगर पालिकेची एकत्रित मालमत्ता कराची देयके येतात. ही मालमत्ता कराची देयके सभासदांच्या व्यक्तिगत नावे करून घेण्यासाठी त्याबाबत चर्चा करून निर्णय घेणे.
8) STRUCTURAL AUDIT संबंधी सभासदांना माहिती देणे.
9) 2024-2025 साठी वैधानिक लेखपरीक्षकाची नेमणूक करणे.
10) नवीन संभासदांबाबत सर्वसाधारण सभेला अवगत करणे.
11) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे अन्य विषय.

Milind

मिलिंद के. राऊळ
(मानद सचिव)

टीप : 1. जर प्रस्तावित वार्षिक सर्वसाधारण सभा गणसंखे अभावी विहित वेळेत सुरू करता आली नाही तर ती सभा अर्धा तास तहकूब करून त्याच दिवशी त्याच ठिकाणी प्रस्तावित करण्यात आलेल्या विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी भरविण्यात येईल व त्यासाठी गणसंखेची आवश्यकता राहणार नाही.

2. सदस्याना वरील विषयांबाबत काही माहिती हवी असल्यास त्यांनी त्याबाबत दिनांक 22.09.2024 पर्यन्त लेखी सूचना द्यावी. ही माहिती सभेत त्या विषयांवरील चर्चेच्या वेळी दिली जाईल .

3. या सभेस सभासद / सहयोगी सभासद हेच केवळ उपस्थित राहून कामकाजात भाग घेऊ शकतात.

4. वरील विशेष सूचीबाबतची टिप्पणी पुढील 4 ते 5 दिवसात देण्यात येईल.

सुचनेची प्रत:

1. संस्थेचा नोटिस बोर्ड.
2. उपनिबंधक सहकारी संस्था टी विभाग, मुलुंड पश्चिम मुंबई 80.
3. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (2) पूर्व उपनगरे कोकण भवन.